


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक ९१, शनिवार १ मार्च २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# प्रत्येक बसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवा

## ■ खा. नीलेश लंके यांची मागणी ■ माळीवाडा बसस्थानकाची पाहणी



■ खा. नीलेश लंके यांनी नगर शहरातील बस स्थानकांतील सुरक्षा व्यवस्थेची पाहणी केली.

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**पुण्यातील स्वारगेट बस स्थानकामध्ये युवतीवर नराधमाकडून बलात्कार केल्याच्या घटनेच्या पार्श्वभुमीवर खासदार नीलेश लंके यांनी नगर येथील माळीवाडा बस स्थानकात जाऊन तेथील सुरक्षा व्यवस्था तसेच सुविधांची पाहणी करत नाराजी व्यक्त केली. विशेषतः महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक बसमध्ये सीसीटीव्ही बसविण्याची मागणी खा. लंके यांनी यावेळी पत्रकारांशी बोलताना केली.**

यावेळी बोलताना लंके म्हणाले, स्वारगेट बस स्थानकामध्ये घडलेली घटना दुर्दैवी आहे. महाराष्ट्रासाठी लाजिरवाणी व काळीमा फासणारी आहे. शाहू फुले आंबेडकर यांच्या महाराष्ट्रात महिला सुरक्षित नाहीत.

राज्य परिवहन महामंडळाचे कर्मचारीही सुरक्षित नसून राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडली आहे. त्याकडे लक्ष देण्यास सरकाराला वेळ नाही. माजी आरोग्य मंत्र्यांचा मुलगा हरवल्यानंतर एक तासात त्याला शोधण्याची तत्परता सरकार दाखवते. दुसरीकडे सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्याकडे अक्षरशः दुर्लक्ष केले जाते.

बसमध्ये माता, भगिनी, महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी यांचे छेड काढण्याचे प्रकार वाढले असून एसटीचा प्रवासही सुरक्षित राहिला नसल्याचा आरोप खा. लंके यांनी यावेळी केला. माळीवाडा बस स्थानकासह पुणे बस स्थानकातील सुरक्षेचीही खा. लंके यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी चालक, वाहक तसेच प्रवाशांशी संवाद साधला.

### त्या अधिकाऱ्यावर कारवाई करा

**जिल्हा परिषदेमध्ये एका विभागाच्या अधिकाऱ्याने एका महिला कर्मचाऱ्यास रात्री ११ वाजेपर्यंत बसवून ठेवल्याचा प्रताप केल्याची बाब निदर्शनास आणून दिली असता खा. लंके यांनी ही बाब निषेधार्ह असल्याचे सांगितले. संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी आपण या पूर्वीच केलेली आहे. अधिकारी व सत्ताधारी यांच्यातील संबंधामुळे असे प्रकार घडत असल्याचे खा. लंके यांनी यावेळी सांगितले.**

### सीसीटीव्ही, पंखे बंद, बसण्यासाठी बाकही नाहीत

**एसटी महामंडळाच्या बसेसमधील प्रवास सुरक्षित मानला जातो. शेतकरी, गोरगरीब वर्ग लाल परीमधून प्रवास करतो. मात्र बसेस तसेच बस स्थानकांमधील स्वच्छतेचा प्रश्न गंभीर आहे. बस स्थानकातील सी सी टीव्ही यंत्रणा बंद असून पंखे तसेच प्रवाशांना बसण्यासाठी बाकेही नसल्याचे लंके यांनी सांगितले.**

# अखेर आरोपी दत्ता गाडेच्या मुसक्या आवळल्या !

## ■ गुनाटमधील शेतातून घेतले ताब्यात ■ स्वारगेट अत्याचार प्रकरण ■ घटनेला वेगळेच वळण लागण्याची शक्यता ?





**शिरूर : प्रतिनिधी**

**स्वारगेट अत्याचार प्रकरणातील आरोपी दत्ता गाडेला पोलिसांनी अटक केली आहे. शुक्रवारी (२८ फेब्रुवारी) मध्यरात्री दीड वाजताच्या सुमारास शिरूर तालुक्यातील गुनाट गावातून त्याला ताब्यात घेतलं आहे.**

स्वारगेट पोलिसांच्या तपास पथकाने ही कारवाई केली असून त्याला शुक्रवारी दुपारी त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. तत्पूर्वी त्याने पोलिसांसमोर मोठा दावा केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी दत्ता गाडेने पोलीस कोठडीत टाहो फोडला आहे. माझं चुकलं, मी पापी आहे, असं म्हणत तो रडत असल्याचं पुढे आलं आहे. तसेच मी तरुणीवर अत्याचार केला नाही, आमचे सहमतीने संबंध झाले, असा दावाही त्याने पोलिसांसमोर केला असल्याचं सांगण्यात आलं आहे.

गेले दोन दिवसापासून दोनशे पोलीस गावात आरोपीचा शोध घेत होते. गावाजवळील एका वस्तीवर आरोपी रात्री पाणी पिण्यास आला होता त्यानंतर संबंधितांनी पोलिसांना माहिती दिल्यानंतर आरोपी शेतातील उसामध्ये लपल्याची पक्की खबर पोलिसांना मिळाली त्यानंतर पोलिस सतर्क झाले आणि अखेर रात्री दीड वाजण्याच्या सुमारास मदतीने पोलिसांनी आरोपी गाडेच्या नाड्या आवळल्या.

स्वारगेट पोलिसांनी त्याला रातोरात पुण्याला हलविले.

पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी याबाबत आज पत्रकार परिषद घेतली. ज्या व्यक्तीने ट्रिगर माहिती दिली, म्हणजे शेवटची माहिती दिली, त्याला १ लाख रुपयांचे बक्षीस दिले जाईल. तसेच संपूर्ण ग्रामस्थांचा सत्कार केला जाईल, असं अमितेश कुमार यांनी यावेळी सांगितलं. त्यांनी गुनाट गावातील ग्रामस्थांचेही आभारही मानले आहेत.

दत्ता गाडेच्या अटकेबाबत बोलताना, गुन्हे शाखेचे पथक, स्वारगेट पोलिसांचे पथक यासह ५०० पोलीस अधिकारी कर्मचारी गेल्या तीन दिवसांपासून गुनाट गावात होते. ४०० ते ५०० ग्रामस्थांच्यावतीने चांगला पाठिंबा मिळाला, श्वान पथकाने सुद्धा उत्तम कामगिरी केली, ड्रोनने आरोपीचा मागा कळला. १.१० वाजता आरोपीला ताब्यात घेण्यात आलं, अटकेची प्रक्रिया पूर्ण झाली आहे, अशी माहितीही अमितेश कुमार यांनी दिली. दुसरीकडे आरोपीने आमचे सहमतीने संबंध होते, असे म्हटल्याची माहिती पुढे येत आहे, त्यामुळे या प्रकरणातील गूढ आणखी वाढले आहे.

### गुनाटकर आता वेगळ्याच धर्मसंकटात !

**आरोपी सापडल्यामुळे गुनाट ग्रामस्थांनी एकीकडे सुटकेचा सुस्कारा सोडला असला तरी दुसरीकडे आता एका नव्याच समस्येने ग्रामस्थ धर्मसंकटात सापडले आहेत. पोलिसांनी आरोपी गाडेचा शोध घेण्यासाठी वापरलेल्या ड्रोन मध्ये पाच ते सहा बिबटे कैद झाल्याची माहिती पुढे आली आहे, त्यामुळे पोलिसांनी ग्रामस्थांना सावधगिरी बाळगण्याची सूचना दिली आहे. गावात या नव्या समस्येने घबराटीचे वातावरण पसरले आहे. वन खात्याने बिबट्याचे अस्तित्व दिसलेल्या संबंधित भागात पिंजरे लावावे व या बिबट्यांना बंदिस्त करावे, अशी मागणी गुनाट ग्रामस्थांनी केली आहे.**

# नगर जिल्ह्यासाठी नव्या बसेस द्या !

## खा.नीलेश लंके यांचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईकांना साकडे



**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**राज्य परिवहन महामंडळाच्या जिल्ह्यातील विविध आगारांकडे असलेल्या बसेसची संख्या कमी असून अनेक बसेस जुन्या झाल्याने मार्गामध्ये बंद पडण्याचे प्रमाण मोठया प्रमाणावर वाढले आहे. प्रवाशांची वाढती संख्या पाहता नगर जिल्ह्यातील सर्व आगारांना नव्या बसेस उपलब्ध करून देण्याची मागणी खा. नीलेश लंके यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केली आहे.**

मंत्री सरनाईक यांना पाठविलेल्या निवेदनात खासदार नीलेश लंके यांनी नमुद केले आहे की, राज्य परिवहन महामंडळाकडून प्रवाशांना विविध सवलती जाहीर केल्यामुळे मागील वर्षीच्या तुलनेत अहिल्यानगर जिल्ह्यात प्रवासी संख्येत वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

वाढत्या प्रवासी संख्येच्या तुलनेत जिल्ह्यात सध्या सर्व आगारांच्या मिळून सुमारे ६०० बसेस आहेत. गेल्या तीन वर्षामध्ये बसेसची संख्या खूप कमी झालेली आहे. तसेच बसेस जुन्या असल्यामुळे मार्गामध्ये बंद पडतात. काही बसेस स्क्रॅप करण्यात आलेल्या असल्याचे खा. लंके यांनी नमूद केले आहे.

### सर्व आगारांना जास्तीत जास्त बसेस मिळाव्यात

**राज्य परिवहन महामंडळाने राज्यातील इतर जिल्ह्यातील काही आगारांना बसेस दिल्याची माहीती आहे. परंतू अहिल्यानगर जिल्ह्यातील तारकपुर आगाराला १० व संगमनेर आगाराला ९ अशा १९ बसेस देण्यात आल्याचीही माहीती आहे. इतर आगारांना मात्र बसेस मिळालेल्या नाहीत. म्हणून इतर सर्व आगारांनाही जास्तीत जास्त बसेस मिळाव्यात अशी मागणी खा. लंके यांनी केली आहे.**

### ग्रामीण विद्यार्थ्यांचे हाल

**बसेसच्या अपुऱ्या संख्येमुळे खेडया-पाडयात जाणाऱ्या बसेसच्या फेऱ्या कमी झाल्याने ग्रामीण भागातून शहरी भागाकडे जाणा-या विशेषतः विद्यार्थी, विद्यार्थिनींचे हाल होत असल्याचे जाणवत असल्याचे खा. लंके यांनी निवेदनात नमुद केले आहे.**

# पानोलीतून दोन अल्पवयीन बहिणींचे अपहरण; पारनेर पोलिस ठाण्यात गुन्हा



**पानोली : प्रतिनिधी**

**नंदूरबार जिल्ह्यातून पानोली येथे मोल-मजुरीसाठी आलेल्या कुटूंबातील दोन अल्पवयीन चुलत बहिणींचे अज्ञात इसमाने अपहरण केल्याची घटना पानोली येथे घडली असून अप-हत मुलीच्या वडिलांनी पारनेर पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.**

फिर्यादीची १६ वर्षाची मुलगी व १५ वर्षांची पुतणी यांचे दि.२६ फेब्रुवारी रोजी रात्री ११ ते गुरूवार दि.२७ रोजी सकाळी साडेसहा वाजण्याच्या दरम्यान अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी कुटूंबियांच्या कायदेशीर रखवालीतून अपहरण केले. नंदूरबार जिल्हयातील कुटूंब पानोली येथे भाडयाच्या घरात राहते. परिसरात मोल-मजुरी करून चरितार्थ चालविते.






स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार

# प्लॅस्टिकपासून जनावरे ठेवा दूर



**प्लॅस्टिक खाल्ल्यामुळे जनावर चारा खात नाही व पाणी पिणे कमी होते, दुग्धोत्पादनामध्ये घट येते, जनावर चारा खात नाही व पाणी पिणे कमी होते. असे दुष्परिणाम टाळण्यासाठी जनावरांना सकस, संतुलित आहार द्यावा. जनावरांच्या सोभोवतलचा परिसर, गोठा प्लॅस्टिक मुक्त ठेवावा. मोकाट किंवा चरण्यासाठी सोडलेली जनावरे बाहेर टाकलेले अन्न प्लॅस्टिकच्या पिशवीसोबतच गिळतात. त्यामुळे जनावरे वेगवेगळ्या दुष्परिणामाला बळी पडतात. प्लॅस्टिकमुळे जनावराच्या आरोग्यावर घातक परिणाम होतात. दुग्धोत्पादन कमी होते. व्यवस्थापनामध्ये अडचणी येतात...**

## जनावरे प्लॅस्टिक का खातात ?

जनावरांमध्ये प्लॅस्टिक खाण्याचे काही महत्त्वाची कारणे आहेत. हिरव्या चाऱ्याची उपलब्धता कमी असणे. सकस व पौष्टिक चारा न मिळाल्याने जनावरामधील कुपोषण व खनिजांची कमतरता आढळते. प्रतिकूल हवामान, जनावरे बांधण्याकरिता अपुरी व्यवस्था, जनावरे मोकट सोडणे अशा अनेक कारणामुळे जनावरे प्लॅस्टिक खातात. सामान्यतः गायी व म्हशींमध्ये प्लॅस्टिक खाण्याचे प्रमाण जास्त आहे. परंतु शेळीमेंढी इतर छोटे रवंथ करणाऱ्या जनावरांमध्ये याचे प्रमाण कमी आहे तसेच रवंथ न करणाऱ्या जनावरामध्ये याचे प्रमाण आढळतच नाही.

## जनावराने प्लॅस्टिक खाल्ल्याची लक्षणे

- जनावर चारा खात नाही व पाणी पिणे कमी होते.
- दुग्धोत्पादनामध्ये घट येते.
- जठराची हालचाल तीन मिनिटाला एकापेक्षा कमी होणे.
- शेणाचे प्रमाण कमी होणे.
- वारंवार पोटफुगी होणे.
- रक्ताची तपासणी केली असता रक्तावर कुठलाच परिणाम दिसून येत नाही.
- शारीरिक तापमान, हृदयाची गती व श्वासाच्या गतीवर काहीच फरक पडत नाही.

## काय कराल ?

उपचार शस्त्रक्रिया करून खाल्लेले प्लॅस्टिक जनावराच्या कोठीपोटातून बाहेर काढणे हा यावर एकमेव उपचार आहे. प्रतिबंधात्मक उपाय जनावरांच्या सोभोवतलचा परिसर, गोठा प्लॅस्टिकमुक्त ठेवावा. प्लॅस्टिकचा वापर नियंत्रित करावा व नंतर त्याची व्हिलेवाट योग्यरीत्या होईल याची काळजी घ्यावी.

## परिणाम काय ?

प्लॅस्टिकच्या विशिष्ट गुणधर्मामुळे ते अन्ननलीकेद्वारे सहज गिळले जाते. प्लॅस्टिक हे न पचणारे न विघटन होणारे असल्यामुळे ते जनावरांनी खाल्ल्यावर सरळ कोठी पोटात जाते व तिथेच साठून राहते. प्लॅस्टिक अल्प प्रमाणात कोठी पोटात असल्यास त्याचे विशेष परिणाम दिसून येत नाहीत, परंतु असे अधिक प्रमाणात प्लॅस्टिक जमा झाल्यामुळे काही दिवसांनी याचे जनावराच्या आरोग्यावर घातक परिणाम दिसून येतात, जसे जणावारंचे पोट गच्च होवून अपचन होणे. जाळी पोटातून खरे पोटात जाण्याचा अन्नाचा मार्ग बंद होणे. जठराची हालचाल मंदावते. खालेल्या प्लॅस्टिकच्या पिश्व्यामुळे पोटामध्ये वेगवेगळे कप्पे तयार होऊन त्यामध्ये अन्न साठले जाते व त्या साठलेल्या अन्नावर पचनक्रिया होत नाही. ओटीपोटाच्या हालचालीमुळे साठलेल्या अन्नाचा मोठा गोळा तयार होतो व तो जाळी पोटातून खऱ्या पोटात जाण्याच्या मार्गावर अडथळा निर्माण करून बाधित जनावराला मृत्यू हेऊ शकतो. मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिक पोटात जमा झाल्यामुळे पोटाची आकुंचन क्रिया मंदावते व त्यामुळे पचनक्रियासुद्धा मंदावते व पोटात वायू जमा होऊन अपचन होते. जठराची गती मंदावल्यामुळे रवंथ क्रिया पूर्णपणे बंद होते. कोठीपोटाची बरीशची जागा प्लॅस्टिकने व्यापल्यामुळे कोठी पोटाला आंबविण्याच्या क्रियेकरिता जागा अपुरी पडते व आंबवण्याच्या क्रियेवर विपरीत परिणाम होतो. कोठीपोटाच्या सामूमध्ये बदल होतो. परिणामी पचन क्रियेला मदत करणारे जिवाणू पोटाच्या आतील दाब वाढल्यामुळे पोट दुखायला लागते. याचा जनावरांच्या मानसिकतेवर परिणाम होऊन त्याची भूक मंदावते.

# आहारातून वाढवा जनावरांची रोगप्रतिकारशक्ती



**जनावरांचे आरोग्य आणि नैसर्गिक रोगप्रतिकारक्षमता टिकवून ठेवणे महत्त्वाचे आहे. यासाठी लसीकरण, आहारातील विशेष घटक, गोठ्याचे व्यवस्थापन, वासरांची योग्य काळजी याकडे लक्ष द्यावे. कारण विषाणूजन्य आजारांमुळे रोगप्रतिकारक्षमता कमी होते. यासाठी संतुलित आहार आणि आरोग्य व्यवस्थापन महत्त्वाचे आहे.**

लम्पी स्कीन आजार तसेच इतर विषाणूजन्य आजारांचा प्रादुर्भाव जनावरांसाठी पर्यायाने दूध उत्पादनासाठी अडचणीचा आहे. हे विषाणू आपले प्रारूप सातत्याने बदलून जनावरांच्या शरीरातील रोगप्रतिकार क्षमता कमी करतात. एकदा का जनावरांमध्ये विषाणूजन्य आजारांचा प्रादुर्भाव झाला, की त्यानंतर दूध उत्पादनात झालेली घट लवकर भरून येत नाही. म्हणूनच लम्पी स्कीन, लाळ्या खुरकूत, तसेच इतर विषाणूंद्वारे होणाऱ्या आजारांपासून बचाव करण्यासाठी आपल्या गाई म्हशींची रोगप्रतिकार क्षमता विविध वातावरणातील बदलांत टिकवून ठेवणे आवश्यक ठरते. विषाणूजन्य आजार हे वासरांच्या मृत्यूसही कारणीभूत ठरतात. गाय, म्हैस विण्याअगोदर ३ आठवडे आणि व्यायल्यानंतर ३ आठवडे असा एकूण ६ आठवड्यांच्या संक्रमण काळात कमी झालेली रोगप्रतिकारशक्ती जनावरांना विविध आजारांचा प्रादुर्भाव होण्यास कारणीभूत ठरते. यासाठी जनावरांचे आरोग्य आणि नैसर्गिक रोगप्रतिकारक्षमता टिकवून ठेवणे, लसीकरण करणे, आहारातील विशेष घटक, गोठ्याचे व्यवस्थापन, वासरांची योग्य काळजी याकडे लक्ष देणे आवश्यक ठरते. कारण विषाणूजन्य आजारांमुळे रोगप्रतिकारक्षमता कमी होऊन इतर जिवाणूजन्य आजार जसे की मस्टायटीस, श्वसन संस्थेचे आजार, पोटाचे आजार होण्याचा धोका दरवर्षी संभवतो. म्हणूनच जनावरांच्या आहार नियोजनाने रोगप्रतिकार प्रणाली अधिकाधिक मजबूत करणे क्रमप्राप्त ठरते.

## रोगप्रतिकार क्षमता वाढविण्यासाठी उपाययोजना

- संतुलित आहार : गाय किंवा म्हशीला तिच्या वजनाच्या ३ टक्के इतका कोरडा चारा एका दिवसात दिला पाहिजे. हा चारा कमी पडल्यास जनावरांचे वजन कमी होत जाऊन रोगप्रतिकारशक्ती कमी होते. म्हणजेच ४०० किलो वजन असलेल्या आणि १० लिटर दूध देणाऱ्या गायीला एकूण १२ किलो पाणी विरहित चारा खाद्य, तसेच इतर घटक दिले गेले पाहिजे.
- चांगल्या प्रतीची प्रथिने : प्रथिने ही अमिनो आम्लांची बनलेली असतात. शरीरात पांढऱ्या रक्त पेशी व प्रतिपिंडांचे (अँटिबॉडी) उत्पादन सुरळीत होण्यासाठी प्रथिनांची गरज असते. चांगल्या प्रतीची प्रथिने गायी, म्हशींना तेलवर्गीय बियांपासून निघालेल्या तेलविरहित पेंडीमधून मिळू शकतात, जसे की मोहरी, सोयाबीन, शेंगदाणा, कपाशी तसेच लसूणघास (अल्फा अल्फा), बरसीम, अझोला यामध्येही चांगली प्रथिने असतात.
- कॅल्शिअम : शरीरातील अनेक जैवरासायनिक क्रिया सुरू ठेवण्यासाठी, स्नायूंचे काम त्यांचे आकुंचन-प्रसरण, संप्रेरकांचे काम, पेशींमधून आत जाणाऱ्या व बाहेर पडणाऱ्या घटकांवर इतर अन्न घटकांच्या साह्याने नियंत्रण ठेवणे, विकर (एन्झाइम्स) कार्यक्षमता वाढविणे इत्यादी कामे कॅल्शिअममुळे सुरळीत होतात. या सर्व क्रिया जनावरांची रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी उपयुक्त ठरतात त्यामुळे जनावरांच्या आहारात पूरक कॅल्शिअम द्यावे. शेवगा पाला, खनिज मिश्रण यामध्येही चांगल्या प्रमाणात कॅल्शिअम उपलब्ध होते.
- जीवनसत्त्व अ : शरीरातील रोगप्रतिकार प्रणाली सांभाळणाऱ्या पेशींना उद्दीपित करून प्रतीपिंडाद्वारे विविध विषाणू व जिवाणूंना निष्प्रभ करते. शरीरात प्रथिनांचे कार्य सुधारते. जनावरांच्या शरीरातील पेशींमध्ये जी टाकाऊ द्रव्ये असतात ती बाहेर न पडल्यामुळे एक प्रकारचा ताण (ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस) जनावरांवर येतो. तो जीवनसत्त्व -अ दिल्यामुळे कमी होण्यास मदत होते. ताज्या हिरवा चाऱ्यामध्ये मुबलक बीटा कॅरोटीनचे रूपांतर जनावरे जीवनसत्त्व-अ मध्ये करतात. तसेच हे जीवनसत्त्व पूरक स्वरूपातही दिले जाऊ शकते.
- लोह व फोलिक आम्ल : लोह किंवा आयर्न हे एक खनिज आहे. फोलिक आम्ल हे ब वर्गीय जीवनसत्त्व आहे. शरीरातील हिमोग्लोबिन व पांढऱ्या पेशींचे कार्य सुरू ठेवण्यासाठी यांची आवश्यकता असते. लोह हे खनिज मिश्रण स्वरूपात व फोलिक आम्ल हे ताज्या हिरव्या चाऱ्याच्या माध्यमातून तसेच पूरक स्वरूपात दिले जाते.
- झिंक (जस्त) आणि जीवनसत्त्व एच : हे शरीरात परस्परपूरक स्वरुपात कार्य करतात. जनावरांच्या शरीरावर बाहेरून होणारी जिवाणू व विषाणूंची आक्रमणे थांबवण्याचे काम यांद्वारे होत असते. शरीरातील विविध चयापचय प्रक्रिया पार पडण्यासाठी झिंक किंवा जस्त अतिशय उपयुक्त असते. तसेच कासेचा दाहसाठी कारणीभूत असलेल्या जिवाणूंपासून जनावरांचे संरक्षण करते.
- सेलेनियम व जीवनसत्त्व ई : गायी, म्हशींना वाढत्या वयानुसार रोगप्रतिकार क्षमतेत जी घट होते ती भरून काढण्याचे कार्य हे दोन्ही घटक करतात. अँटिऑक्सिडंट म्हणूनही काम करतात. हे दोन्ही घटक सोबत व परस्परपूरक पद्धतीने शरीरात कार्य करतात. सुलभ प्रसूती, दुधातील दैहिक पेशी कमी करणे, वासरांचे मृत्यू कमी करणे यामध्ये सेलेनियम व जीवनसत्त्व ई उपयुक्त ठरतात.
- जैवसक्रिय केलेली स्निग्धाम्ले (बायोॲक्टिव्हेटेड फॅटी ॲसिड्स) : या तंत्रज्ञानाद्वारे लघू व मध्यम साखळीयुक्त स्निग्धाम्ले जसे की प्रोपिओनिक, ॲसिटिक आणि लौरिक आम्ल यातील अशुद्धता काढून त्याचे इस्टर स्वरूपात रूपांतर केले जाते. ज्यामुळे ही आम्ले जनावरांच्या आतड्यातून शरीरात जाऊन विविध प्रकारचे विषाणू व जिवाणूंना प्रतिबंध करण्यास शरीर नैसर्गिकरीत्या सक्षम होते. अशा प्रकारचे अन्नघटक जनावरांच्या शरीरात रोग प्रतिकारशक्ती वाढविण्यास अतिशय उपयुक्त ठरतात तसेच जनावर संक्रमित झाल्यास आजारातून बरे होऊन बाहेर येण्यासाठीही तसेच दूध उत्पादन व वाढ पूर्ववत होण्यासाठीही वरील घटक महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. पशुवैद्यकाच्या किंवा पशुआहारतज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार या आहारघटकांचा वापर गरजेनुसार करावा.

**वजनानुसार गाई-म्हशींना खाद्य व चारा देण्याचे प्रमाण**

| जनावराचे वजन (किलो) | एकूण शुष्क पदार्थ (वजनाच्या ३ टक्के) | पशुखाद्य (किलो) | कोरडा चारा (किलो) | हिरवा चारा (किलो) |
|---|---|---|---|---|
| ४०० | १२ किलो | ५.५ | ४ | १८ |
| ४५० | १३.५ | ६ | ४.५ | १६ |
| ५०० | १५ किलो | ६.५ | ५ | २२ |
| ५५० | १६.५ किलो | ७ | ५.५ | २५ |

# कासदाह

## आजाराची लक्षणे, प्रतिबंध, उपचार

**देशी गाईंच्या तुलनेने संकरित गाईंमध्ये पहिल्या प्रसूतीपेक्षा नंतरच्या प्रसूतींच्या काही दिवसांनतर किंवा काही दिवस आधी कासदाह आजार अधिक प्रमाणात होतो. जिथे जनावरांची संख्या जास्त असते तिथे कासदाहाचा संभव जास्त असतो. ज्या जनावरांच्या जातींमध्ये कास छोटी आणि सडे मोठी असतात, अशा जनावरांमध्ये कासदाह अजार होण्याचे प्रमाण जास्त असते. कासदाह हा प्रामुख्याने दुधाळ गायी-म्हशींमध्ये होणारा जिवाणूजन्य आजार आहे. हा आजार म्हशींपेक्षा गायींमध्ये जास्त प्रमाणात होतो, ज्या गायी जास्त दूध देतात. ज्या जनावरांना खाद्यातून अधिक प्रमाणात प्रथिने दिली जातात व ज्या जनावरांचा जार पडत नाही त्यांच्यामध्ये कासदाह होण्याची जास्त शक्यता असते. या आजारात दूध गोठते, कास गरम होऊन सुजते. कधी कधी रक्तस्त्रावही होतो.**



कासेमध्ये जिवाणू आत प्रवेश करतात. मुख्यतः स्टॅफिलोकोकाय, स्ट्रेप्टेकोकाकय, कोरीने बॅक्टेरिया, इकोलाय अणि बॅसिलस या जिवाणूमुळे कासदाह अजार होतो. हा एक संसर्गजन्य रोग आहे. जिवाणू कासेला झालेल्या जखमांमधून सडांच्या माध्यमातून कासेमध्ये प्रवेश करतात. रक्त शोषणाऱ्या मोठ्या आकाराच्या माश्याही या आजाराचा प्रसार करतात.

### दीर्घकालीन कासदाह

- कास अधिक कठोर व लहान होते.
- दूध पातळ व पाण्यासारखे येते.
- कधी कधी कासेला फोड येतात.
- कास दाबल्यानंतर वेदना होतात.
- अंतिम टप्प्यात दूध पूर्णपणे बंद होते.

### लक्षणे कोणती ?

जनावरांमध्ये अस्वस्थता व ताप येणे. कास गरम, लाल होते, वेदना होतात, काही वेळाने ताप येतो व कास थंड आणि कठोर होते. सडांमधून दूध येणे बंद होते, सडातून पिवळसर रक्तयुक्त स्राव येतो. नेहमीच्या (सामान्य) दुधापेक्षा दह्यासारखसारखे स्वरूप असणारा स्राव, पिवळ्या, भुऱ्या स्रावासोबत पांढरे (गोठलेले) कण व एपिथेलियम टिश्यू (पेशी) येतात . तीक्ष्ण कासदाह तीव्र कासदाहामध्ये हळूहळू दूध येणे बंद होत. कास सुजते.

### उपचार कोणती करावीत ?

कोणतेही प्रतिजैविके वापरण्यापूर्वी, दुग्धप्रतिजैविक संवेदनशीलता तपासावी व पशुवैद्यकाच्या सल्ल्यानुसार द्यावे. सडामधून पूर्णपणे खराब दूध काढून टाकावे. दिवसातून एकदा प्रतिजैविके ट्यूबद्वारे द्यावीत. जर संसर्ग अधिक असेल तर सकाळी व संध्याकाळी दिवसातून दोनदा द्यावीत. तीव्र कासदाहामध्ये कास गरम होते तेव्हा शेकमध्ये मॅग्नेशियम सल्फेटचा वापर केला जातो. या अवस्थेत कासेला थंड करावे आणि दीर्घकालावधीतील कासदाह असेल जेव्हा कास थंड व कडक होते तेव्हा उबदार शेक द्यावा.

### कासदाह आजाराची कारणे

- कासेला जखमा होणे.
- दूध काढणाऱ्याचे अस्वच्छ हात व कपडे.
- गोठ्याची अस्वच्छता.
- गोठ्यामध्ये घोंगावणाऱ्या माश्या
- धार काढण्याची चुकीची पद्धत.
- दूध पूर्ण न काढणे.
- गोठ्यातील पृष्ठभाग सतत ओला असणे, गोठ्यामध्ये स्वच्छता नसणे.
- दुधाळ आणि मोठी कास असणाऱ्या जनावरांमध्ये कासदाह होण्याचे प्रमाण जास्त आहे. मोठ्या कासेमुळे सडांना व कासेला दुखापत होण्याची शक्यता असते.
- जार लटकणे (पूर्णपणे न पडणे) किंवा प्रसूतीच्या वेळी झालेला संसर्ग.
- अन्य आजारांचा प्रभाव.

### रोग प्रतिबंध

कासदाह मुख्यता अस्वच्छतेमुळे पसरतो. त्यामुळे गोठ्याची पूर्ण स्वच्छता ठेवावी. गोठ्यामध्ये दर १५ दिवसांनी जंतुनाशक फवारावे. दूध काढण्यापूर्वी व नंतर आयोडीन सोल्यूशन (०.२५ टक्के) ने सडांना धुवावे व स्वच्छ हाताने दूध काढावे. दूध काढताना पूर्ण हाताचा उपयोग करावा, अंगठ्याने दूध काढू नये. दूध काढताना सडांमधून संपूर्ण दूध काढावे. गाय व म्हशींना दूध काढल्यानंतर अर्धा तास बसू देऊ नये. आजारी जनावरांचे दूध त्यांच्या वासरांना पाजू नये. आजारी जनावरांना निरोगी जनावरांपासून वेगळे ठेवावे व त्यांचे दूध शेवटी काढावे. वेळोवेळी सर्व जनावरांच्या दुधाची चाचणी करावी. स्ट्रिपकप पद्धतीने दुधाची चाचणी करावी. वेळेवर कासदाहचा उपचार झाला नाही तर टी. बी. रोगाचे जिवाणूदेखील आत प्रवेश करतात व त्यामुळे रोग आणखी गंभीर होतो. उपचार सुरू झाल्यानंतर तीन ते पाच दिवस ट्यूब व इंजेक्शन सोडले पाहिजे. एक किंवा दोन दिवसांत पूर्णपणे उपचार होत नाही. कासदाहाच्या उपचारासाठी प्रतिजैविके पशुवैद्यकाच्या सल्ल्यानुसार द्यावी. दूध कमी होताना गायी व महशींच्या चारही सडांमधून संपूर्णपणे दूध काढावे व प्रत्येक सडामध्ये ट्यूबने औषधे सोडावीत.



# औषधी वनस्पती ठरतात जनावरांतील आजारावर लाभदायी

**जनावरांच्या दैनंदिन व्यवस्थापनात किंवा आजारावर उपचार करताना घरगुती पद्धतीने वनौषधींचा वापर केल्यास खर्च कमी करता येतो. मात्र सांसर्गिक आजाराची तीव्र लक्षणे असलेल्या जनावरांवर पशुवैद्यकांकडून उपचार करून घ्यावेत.**

» **अतिसार आजार :** निकृष्ट किंवा खराब, बुरशीजन्य चारा किंवा खाद्य जनावरांनी खाल्ल्यास पोटात अपचन होऊन जनावरांना हगवण लागते. हगवण ३ दिवसांपेक्षा अधिक दिवस असल्यास शरीरातील पाणी आणि इतर शारीरिक पोषक कमी होऊन जनावरे अशक्त व कमजोर होतात.
**उपचार :** एक ओंजळ चांगले बारीक दळलेले कोवळे डाळिंब, पेरू, कडुनिंबाची पाने, ५० ग्रॅम सुंठ पावडर आणि १०० ग्रॅम गूळ या मिश्रणाच्या बोराच्या आकाराच्या गोळ्या तयार कराव्यात. ३ गोळ्या एकावेळेस याप्रमाणे दिवसातून ३ वेळा हगवण बरी होईपर्यंत जनावरांना खायला द्यावेत. जनावराच्या शरीरातील पाणी कमी झाले असल्यास पाणी, साखर व मीठ यांचे द्रावण पाजावे.

» **गोचीड नियंत्रण :** जनावरांना गोचीड ताप येतो. शारीरिक वाढ खुंटून जनावर बारीक दिसते. दुधाळ जनावरांच्या दुग्ध उत्पादनात लक्षणीय घट होते.
**उपचार :** प्रत्येकी २० ग्रॅम आले, तुळस, कडुनिंबाची पाने, हळद पावडर आणि सीताफळाच्या बिया एकत्रितपणे चांगल्या बारीक करून २५० मिलि. कडुनिंबाच्या तेलात उकळावे आणि थंड झाल्यावर तयार मिश्रण जनावरांच्या शरीराला लावावे.

» **विषबाधा :** जनावरे कुरणावर चरताना काही विषयुक्त पदार्थ किंवा विष खाल्ल्यामुळे विषबाधा होते आणि वेळीच योग्य उपचार नाही मिळाल्यास जनावरे दगावतात. सौम्य स्वरूपाच्या विषबाधेवर घरगुती उपचार करता येतात.
उपचार : १० ग्रॅम विड्याची पाने, तुळशीची पाने, काळी मिरी व सुंठ एकत्रित बारीक करून कोमट पाण्यात मिसळून जनावरांना त्वरित पाजावे. विषबाधा तीव्र स्वरूपाची असल्यास ताबडतोब पशुवैद्यकीय उपचार करावे.

» **वंध्यत्व :** गायी-म्हशी वांझ राहतात किंवा माजावर येत नाहीत किंवा वारंवार माजावर येतात किंवा काही जनावरांचा माज मुका असतो.
**उपचार :** कोरफडीचे ३ पाने उपाशीपोटी ३ दिवस खायला द्यावीत. सोबतच कोंब आलेले हरभरा किंवा बाजरी किंवा गहू १५ दिवस वंध्यत्व असलेल्या जनावरांना खाऊ घालावेत. जर १५ दिवसांनी जनावर माजावर आल्यास फळविण्याच्या अगोदर १५० मिलि कडुनिबांचे तेल पाजावे.

## शॉर्ट न्यूज

### पुणतांबा पाणीपुरवठा योजनेच्या कामात त्रुटी

**पुणतांबा :** गावाला भेडसावणाऱ्या पाणीटंचाई समस्या तसेच वाडी-वस्तीवरील पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी मंजूर झालेल्या ३३ कोटीच्या दोन पाणी योजनांच्या कामातील अनेक त्रुटी व अनियमितपणामुळे पाणी प्रश्न सुटण्याऐवजी गंभीर झाला. गावाला सात दिवसांनंतर पाणीपुरवठा होत असल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी पसरली आहे. या कामात अनेक त्रुटी व अनियमितता झाल्यामुळे पाणी योजना समिती सचिव वंदना धनवटे व शिवसेनेचे सुहास वहाडणे यांनी मंत्रालयात तक्रारी केल्या.

### जलजीवन मिशनची कामे रखडली

**श्रीरामपूर :** तालुक्यातील दत्तनगरसह ग्रामीण पाणीपुरवठा योजना तसेच जलजीवन मिशन अंतर्गत केली जाणारी कामे, गेल्या काही दिवसांपासून रखडली आहेत. त्यामुळे तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. सदरच्या जलजीवन मिशन योजनेतील कामे पूर्ण न झाल्याने गावागावांमध्ये असंतोष निर्माण झालेला आहे. याबाबत पालकमंत्री विखे पाटील यांनी लक्ष घालून तालुक्यातील पाणीपुरवठा योजनेबाबत सदर यंत्रणेची स्वतंत्र बैठक घेऊन, हा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी श्रीरामपूर पंचायत समितीच्या माजी सभापती शिंदे यांनी केली आहे.

### केस मागे घेण्यासाठी महिलेला मारहाण

**केडगाव :** कोर्टात दाखल केलेली केस मागे घेण्यासाठी महिलेवर हल्ला करून शिवीगाळ व धमकी दिल्याप्रकरणी सहा जणांविरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित महिलेने दिलेल्या जबाबावरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. केडगाव उपनगरात शनिवारी ( २२ फेब्रुवारी) रात्री ही घटना घडली. जालेश बाबड्या काळे, रूपेश नारायण चव्हाण, आलेश बाबड्या काळे, रोहीत तुकाराम चव्हाण, राहुल छोट्या काळे व नारायण झेड्या चव्हाण (रा. भोसले आखाडा, शास्त्रीनगर, केडगाव) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

### मंदिर विकासासाठी शासन कटिबद्ध

**अकोले :** सामाजिक दायित्व निधीतून अगस्ति ऋषी मंदिरासाठी पाच लाख रुपयांची मदत देण्यात येईल, राज्य शासन मंदिराच्या विकासासाठी भरीव निधी उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी केले. प्रादेशिक पर्यटन योजनेतून अकोले येथील अगस्ति ऋषी मंदिराच्या विकासासाठी तीन कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून सभामंडप आणि संरक्षक भिंतीच्या कामांचे भूमिपूजन मंत्री झिरवाळ यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

### खून प्रकरणातील आरोपीला अटक

**नगर :** कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनैतिक संबंधातून खून झाला होता. या खून प्रकरणातील पसार आरोपीला कर्जत पोलिसांनी अटक केली. राजू दत्तू सुरवसे (वय २९, रा. माळीगल्ली, ता. कर्जत) असे जेरबंद आरोपीचे नाव आहे. केडगाव येथे प्रेयसीचा साडीने गळा आवळून खून करून पसार झालेल्या राजूला पोलिसांनी ताब्यात घेतले. मोहिनीनगर केडगाव देवी मंदिरामागे केडगाव येथे राजूने त्याची प्रेयसी संगीता नितीन जाधव हिच्या चारित्र्यावर संशय घेत तिचा साडीने गळा आवळून खून केला होता. खुनानंतर तो लगेच पसार झाला होता.

# मराठी भाषेच्या प्रसाराकरीता ग्रंथ प्रदर्शनासारखे उपक्रम उपयुक्त

**ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचे मत । जिल्हाधिकारी कार्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा**



**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**मराठी भाषा गौरव दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित ग्रंथ प्रदर्शनाचे उद्धाटन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. मराठी भाषेच्या प्रसारासाठी ग्रंथ प्रदर्शनासारखे उपक्रम उपयुक्त असल्याचे सांगून त्यांनी जिल्हावासियांना मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा दिल्या.**

यावेळी अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, निवासी उपजिल्हाधिकारी शाहुराज मोरे, तहसिलदार शरद घोरपडे, विनायक देशमुख आदी उपस्थित होते.मराठी भाषेच्या संवर्धनासाठी व्यवहारात मायबोली मराठीचा वापर अधिकाधिक होणे आणि विविध क्षेत्रातील ज्ञान मराठी पुस्तकांच्या माध्यमातून पोहोचविले जाणे आवश्यक असल्याचे मतही पालकमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केले.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त निवासी उपजिल्हाधिकारी शाहुराज मोरे यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मराठी भाषेच्या संवर्धन आणि विकासासाठी भाषेचा व्यवहारात उपयोग करणे आणि इतर भाषांमधील शब्द मराठीत आणणे आवश्यक असल्याचे मत श्री. मोरे यांनी यावेळी व्यक्त केले.कार्यक्रमाला मराठी भाषा समितीचे सदस्य किशोर मरकड, पत्रकार अशोक निंबाळकर, उपजिल्हाधिकारी भारती सगरे, जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बढे, तहसिलदार शरद घोरपडे, डॉ.अमोल बागुल आदी उपस्थित होते.

श्री.मोरे म्हणाले, व्यवहारात सुटसुटीत भाषा आणि सोप्या शब्दांचा उपयोग करणे गरजेचे आहे. विशेषत: शासकीय कार्यालयात सामान्य माणसाला कळेल अशा शब्दांचा उपयोग करावा. भाषेच्या विकासासाठी समाजमाध्यमांवरील मजकूर मराठीतून तयार करण्यास प्रोत्साहीत करण्यात यावे. एखाद्या पुस्तकावर चर्चा झाल्यास भाषेचा प्रवाह वेगवान होण्यास मदत होत असल्याने मराठीतील पुस्तकांवर चर्चा घडवून आणणे आवश्यक आहे. साहित्य संमेलनांसारख्या उपक्रमांचे आयोजन यासाठी उपयुक्त ठरते, असे त्यांनी सांगितले.

मराठीतील संशोधनला चालना देणे, शालेयस्तरावर मराठी भाषेसंदर्भातील उपक्रमांचे आयोजन, बोली भाषेचे संवर्धन व अभ्यास या माध्यमातून मराठी भाषा अधिक समृद्ध होईल, असेही श्री.मोरे म्हणाले.


श्री.निंबाळकर म्हणाले, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जाचा मिळाल्यांनंतर या कार्यक्रमाचे आयोजन होत असल्याने या दिवसाला महत्व आहे. शासकीय कार्यालयांमध्ये मराठीचा उपयोग अनिवार्य करण्यात आला आहे. भाषेच्या विकासामुळे सांस्कृतिक विकासालाही चालना मिळत असते. त्यामुळे मातृभाषेचे संवर्धन आवश्यक आहे. लेखक भाषेला समृद्ध करतो, त्यामुळे शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांनी देखील लेखन करावे. विशेषत: व्यवहारातील शब्द आणि भाषेबाबत लिखाण आवश्यक आहे. त्यासोबतच बोली भाषाही समृद्ध करण्याची आवश्यकता असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

श्री.मरकड म्हणाले, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषा जगाच्या नकाशावर पोहोचली आहे. मराठीचे संवर्धन करण्याची आणि तिला समृद्धीच्या शिखरावर नेण्याची जबाबदारी सर्वांची आहे. महसूल संबंधी पुस्तकांचेदेखील एक ग्रंथालय असणे आवश्यक आहे. प्रत्येकाने किमान आठ दिवसात एखादे पुस्तक वाचावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त् केली.

कार्यक्रमाला जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमानिमित्त डॉ.बागूल यांनी काढलेली रांगाळी विशेष चित्तवेधक आणि माहितीपूर्ण होती.

# श्रीरामपुरात ७० गोवंशीय जनावरांची कातडी जप्त

**■ अनधिकृत कत्तलखान्यांवर कारवाई**
**■ एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल**



**श्रीरामपूर : प्रतिनिधी**

**श्रीरामपूर नगरपालिकेने पुन्हा एकदा अतिक्रमण विरोधी मोहीम सुरू केली आहे. गुरुवारी वॉर्ड क्रमांक २ मधील काझीबाबा रोडवरील बेकायदेशीर कत्तलखान्यांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान ७० गोवंशीय जनावरांची कातडी आणि मांसाचे तुकडे जप्त करण्यात आले.**

कारवाई नगरपालिकेचे मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. त्यांच्यासोबत पोलिस उपअधीक्षक डॉ. बसवराज शिवपुजे, पोलिस निरीक्षक नितीन देशमुख आणि नगर अभियंता सूर्यकांत गवळी यांच्यासह अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

पोलिस कॉन्स्टेबल रवींद्र शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, जप्त करण्यात आलेली कातडी अकरम कुरेशी याच्या पत्र्याच्या शेडमध्ये सापडली. कारवाईदरम्यान आरोपी अकरम कुरेशी फरार झाला असून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मुख्याधिकारी घोलप यांनी स्पष्ट केले की श्रीरामपूर शहरातील अतिक्रमण विरोधी मोहीम थांबणार नाही आणि अशा कारवाया सुरूच राहतील.

# विद्याधामला सांघिक विजेतेपदाचा फिरता चषक

**समृद्धी कारखिले मोठ्या गटात प्रथम**

**शिरूर : प्रतिनिधी**

**डेक्कन एज्युकेशन सोसायटी इंग्लिश व सेमी इंग्लिश मिडियम स्कूल शिरुर , समर्थ सेवा मंडळ शिरुर ,यांच्या वतीने स्वातंत्र्यवीर सावरकर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेमध्ये प्रशालेस सांघिक विजेते पदाचा फिरता चषक मिळाला.**



लहान गटात मनाली सरोदे हिचा तृतीय क्रमांक व श्रेया गाडेकर सहभाग प्रमाणपत्र मिळाले.मोठ्या गटात समृध्दीकारखिले हिचा प्रथम क्रमांक व समृद्धी चौधरी सहभाग प्रमाणपत्र मिळाले. अशी माहिती प्रशालेचे प्राचार्य गुरूदत्त पाचर्णे यांनी दिली.यशस्वी विद्यार्थांना लहान गटात ललिता भुजबळ, सारिका वेताळ, हरी पवार, हरिभाऊ भुसारे तसेच मोठा गटात पूनम पवार, सुनिता दाते, संदिप यादव, विवेक घोडेराव,अश्विनी गायकवाड यांनी मार्गदर्शन केले.

सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे प्रशालेचे प्राचार्य गुरूदत्त पाचर्णे, पर्यवेक्षक दिगंबर नाईक, मच्छिंद्र बनकर, चंद्रकांत देविकर तसेच संस्थेचे अध्यक्ष अनिल बोरा, सचिव नंदकुमार निकम,शालेय समितीचे अध्यक्ष धरमचंद फुलफगर यांनी अभिनंदन व कौतुक केले.

# संजय राऊत यांच्या प्रतीकात्मक प्रतिमेस मारले जोडे

**महायुतीच्या कार्यकर्त्यांची घोषणाबाजी । एकत्रित येत व्यक्त केला निषेध**

**संगमनेर : प्रतिनिधी**

**विधानपरिषदेच्या उपसभापती शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या निलम गोऱ्हे यांच्याविषयी उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी अपमानास्पद वक्तव्य केले, असा आरोप करत संगमनेर येथे महायुतीच्या वतीने खासदार राऊत यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. तसेच खासदार राऊत यांच्या प्रतीकात्मक प्रतिमेला जोडे मारो आंदोलन करत त्या फलकाचे दहन करण्यात आले.**



आमदार अमोल खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली महायुतीच्या कार्यकर्त्यांनी संगमनेर बसस्थानक प्रवेशद्वाराजवळ एकत्रित येत निषेध व्यक्त केला. यावेळी आमदार खताळ यांच्या पत्नी निलम खताळ, शिवसेनेच्या महिला जिल्हाप्रमुख कावेरी नवले, भाजपाच्या ओबीसी महिला मोर्चाच्या सरचिटणीस पायल ताजने, शिवसेना उपजिल्हाप्रमुख दिपाली वाव्हळ, तालुकाप्रमुख संगीता बांबळे, शहरप्रमुख वैशाली तारे उपशहर प्रमुख मनीषा पंधारे या महिला पदाधिऱ्यांनी खासदार राऊत यांच्या प्रतीकात्मक फलकाला जोडेमारो आंदोलन करत निषेध व्यक्त करण्यात आला.

# एमआयडीसीतील अतिक्रमणे काढली

**सुपा पोलिसांचा चोख बंदोबस्त**



**सुपा : प्रतिनिधी**

**सुपा-पारनेर जुन्या व नव्या औद्योगिक वसाहतीमधील अतिक्रमणे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने सुपा पोलीस ठाण्याच्या बंदोबस्तात काढण्यात आली.**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार देशभरातील अनधिकृत अतिक्रमणे काढण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने मागील काही दिवसात पुणे-नगर महामार्ग, सुपा परिसर तसेच दोन्ही औद्योगिक वसाहतीमधील अतिक्रमणे हटविण्याची मोहिम हाती घेण्यात आली होती.

गेल्या आठवडयात सुप्यातील बसस्थानक चौक, नगर-पुणे महामार्ग, सुपा-पारनेर रस्त्यावरील अतिक्रमणधारकांना नोटीस बजावण्यात आल्याने नुकसान टाळण्यासाठी अतिक्रमणधारकांनी स्वतः अतिक्रमणे काढून घेतली. उर्वरीत अतिक्रमणे पुढील आठवडयात काढण्यात येणार आहेत.

शुक्रवारी सार्वजनिक बांधकाम विभगाचे अधिकारी, औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी, नगर-पुणे महामार्गाची देखभाल करणारी चेतक ऐन्टरप्राईजेस या कंपनीचे अधिकारी, कर्मचारी यांनी जुन्या औद्योगिक वसाहतीमधील अतिक्रमणे जमिनदोस्त केली. त्यानंतर नव्या औद्योगिक वसाहतीमधील अतिक्रमणे हटविण्यात आली.

यावेळी दंगल नियंत्रण पथकासह सुपा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरिक्षक सोमनाथ दिवटे, पोलिस उपनिरिक्षक मंगेश नागरगोजे, मोनिका जोजाट, कानगुडे, सुनील कुटे, विकास गायकवाड यांनी चोख पोलिस बंदोबस्त ठेवला होता.

महामार्गासह सुपा परिसर तसेच औद्योगिक वसाहतीमधील अतिक्रमणे काढण्यात आल्याने रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला आहे. लवकरच उर्वरीत अतिक्रमणेही हटविण्यात येणार असल्याने नागरीकांना आपली अतिक्रमणे स्वतः काढून घ्यावीत व नुकसान टाळावे असे आवाहन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# काळ बदलला तशा कविताही बदलल्या !

**। राज ठाकरे यांचे मत । कोण तूं रे कोण तूं कविता केली सादर**
**। मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन**

**मुंबई : प्रतिनिधी**

**मराठी भाषा दिनानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे अभिजात पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी संवाद साधला. तसेच या कार्यक्रमाला अनेक मान्यवर उपस्थित**



**होते. ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, महेश मांजरेकर, रितेश देशमुख, जावेद आख्तर, असे अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी राज ठाकरे यांनी कविता सादर केली. ही कविता बाबासाहेब पुरंदरे लिखित हे काव्य आहे, छत्रपती शिवाजी महाराजांना उद्देशून हे काव्य लिहिले आहे.**

उपस्थितांशी संवाद साधताना राज ठाकरे म्हणाले, मी इथे भाषण करायला आलो नाही. माझे भाषण ३० तारखेला ठेवले आहे तेव्हा मी बोलेल. मराठी भाषा दिवस, मराठी भाषा गौरव दिन. सरकारने जाहीर केले होते पण सरकारलाही माहीत नव्हते की हा दिन साजरा केला जातो. याची सुरुवात आपण केली. अनेक ठिकाणी आपण या कार्यक्रमाला सुरुवात केली आहे. आज आशाताई आल्या आहेत, त्यांना बरे वाटत नसताना देखील आज त्या इथे आल्या आहेत.

एक गोष्ट मी आपल्याला निश्चित सांगेल की तुम्हाला सगळ्यांना प्रश्न चिन्ह पडला असणार की इथे उपस्थित सगळे मान्यवर आज तुमच्यासमोर कविता म्हणणार आहेत. तुम्हाला प्रश्न पडला असणार की जावेद अखतर इथे काय करणार आहेत. त्यांना बोलवण्याचे सगळ्यात मोठे कारण म्हणजे भाषा, भाषा या विषयावर मी त्यांचे एक भाषण ऐकले होते. त्यावेळी मी विनंती केली की सोनाऱ्याने कान टोचल्यावरच तर ते लक्षात राहतात. ही मराठी भाषा, ही अभिजात भाषा, कशी टिकवली पाहिजे.



# वडगांव सावताळ, वासुंदे येथे सबस्टेशन हवे

## सुजित झावरे पाटील यांचे पालकमंत्र्यांना साकडे



**सब स्टेशन आणि एसटी बसेसच्या प्रश्नासंदर्भात जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी मंत्री राधाकृष्ण विखे यांनी भेट घेऊन निवेदन सादर केले.**

**वासुंदे : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील वडगांव सावताळ व वासुंदे या दोन्ही गावांचा भौगोलिकदृष्टया विस्तार मोठा असून तिथे वीजेचा प्रश्न सातत्याने निर्माण होत असल्याने मध्यवर्ती असलेल्या या दोन्ही गावांपैकी एका गावामध्ये वीजेचे सबस्टेशन उभारण्याचे साकडे जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्हयाचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांना घातले.**

सुजित झावरे पाटील यांनी मंत्री राधाकृष्ण विखे यांनी भेट घेऊन दोन्ही गावांपैकी एका गावामध्ये सबस्टेशन झाल्यास दोन्ही गावांसह परिसरातील अनेक गावांचा वीजेचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार असल्याचे निदर्शनास आणून दिले. यासंदर्भात उर्जा विभागास या भागात सबस्टेशन मंजुरीसाठी आदेश देण्याची मागणी झावरे पाटील यांनी केली.

दरम्यान, राज्य परिवहन महामंडळाच्या पारनेर आगारात ६५ बसेस होत्या. काही कालावधीनंतर या बसेसची संख्या कमी करण्यात येऊन सध्या आगारात ४५ बसेस आहेत. त्यातील १० बसेस ३१ मार्च अखेर स्क्रॅपमध्ये जाणार आहेत. सध्या आगारात २५ बसेस कमी असल्याने तसेच नियमित बसेसच्या वेळांमध्ये बदल करण्यात आल्याने शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच ग्रामीण भागातील नागरीकांचे, आदिवासी भागातील नागरीकांचे मोठया प्रमाणावर गैरसोय होत आहे. यासंदर्भात राज्य परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक यांना उचित निर्देश देऊन योग्य कार्यवाही करण्याचे साकडे सुजित पाटलांनी मंत्री विखे यांना घातले. दोन्ही मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही मंत्री विखे यांनी सुजित झावरे पाटील यांना दिली.

# कौडेश्वर वाचनालय उपक्रमशील!

## सहा. पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांचे गौरवोद्गार




**शहजापुर : प्रतिनिधी**

**शहाजापुरसारख्या दुर्गम भागातील कौडेश्वर सार्वजनिक वाचनालय हे ग्रंथसंपदेने परिपूर्ण असून वाचकांसाठी विविध उपक्रम राबविणारे हे उपक्रमशील वाचनालय असल्याचे गौरवोद्गार सुपा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांनी काढले.**

मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून कौडेश्वर वाचनालयामध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी दिवटे यांनी वाचनालयाच्या व्यवस्थापनाचे कौतुक केले.

यावेळी सहा. पोलीस निरीक्षक दिवटे यांच्या हस्ते जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना वाचनीय पुस्तके भेट देण्यात आली. यावेळी पोलीस उपनिरीक्षक मंगेश नागरगोजे, पोलिस हवालदार अमोल धामणे, पो. कॉ. विकास गायकवाड, सहा. फौजदार कैलास इथापे, जिल्हा ग्रंथालय संघाचे विश्वस्त शशिकांत झंजाड, सरपंच अण्णासाहेब मोटे , जिल्हा परिषदे शाळेचे शिक्षक किरण पवार, शालेय विद्याथ यावेळी उपस्थित होते. यावेळी ग्रंथपाल सुरेंद्र शिंदे यांनी ग्रंथालयाच्या वतीने वर्षभर राबविले जाणारे उपक्रम व वाचकांना जास्तीत जास्त सेवा देण्यासाठी करण्यात येणा-या प्रयत्नांची माहीती देत उपस्थितांचे आभार मानले.

### कुसुमाग्रजांचे सांस्कृतिक क्षेत्रात योगदान

कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिन मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले असून मराठी ही राजभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले. मातृभाषेचा गौरव व कुसुमाग्रज यांच्या स्मृतींना अभिवादन म्हणून त्यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो.

**सोमनाथ दिवटे**
सहा. पोलीस निरीक्षक, सुपा पोलीस स्टेशन

# लिंबाजी शिंदे यांचे निधन



**सारोळा अडवाई : प्रतिनिधी**

**येथील जुन्या पिढीतील गावकारभारी व सेवा संस्थेचे माजी संचालक लिंबाजी गवराम शिंदे यांचे अल्पआजाराने निधन झाले ते ८५ वर्षांचे होते. कारभारी या नावाने ते प्रख्यात होते.**

सारोळा अडवाईच्या सामाजिक,धार्मिक जडणघडणीत त्यांचा मोठा वाटा होता.जुन्या पिढीतील गावकारभारांसमवेत त्यांनी कारभार केल्याने त्यांना कारभारी या नावाने संबोधले जात होते. अचानक मेंदू विकाराचा तीव्र झटका आल्याने त्यांना नगर येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.मात्र उपचारादरम्यानच त्यांचे निधन झाले. चाकण येथे उद्योगक्षेत्रात कार्यरत असणारे संतोष शिंदे यांचे ते वडील होत. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा ,दोन मुली,सुना,नातवंडे असा परिवार आहे.

# मुलिकादेवी महाविद्यालयात रंगले कवी संमेलन !

## मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य | कवितांनी श्रोत्यांची मने जिंकली

**निघोज : प्रतिनिधी**

**येथील श्री.मुलिकादेवी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आजोजित करण्यात आलेले कवी संमेलन अतिशय रंगतदार झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सहदेव आहेर होते.**

कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात येतो. त्याचे औचित्य साधून श्री.मुलिकादेवी महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ कवी संजय पठाडे, कारभारी बाबर, डॉ. प्रवीण जाधव, संदीप राठोड, साहेबराव घुले इत्यादी कवींनी संमेलनात




सहभागी होऊन विविध विषयावरील कविता सादर केल्या. मराठी भाषा, स्त्री जीवन, शेतकरी जीवन, आई-वडील, प्रेम इत्यादी विषयांसह राजकीय भाष्य करणार्या कवितांनी श्रोत्यांची मने जिंकली. महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु. वैष्णवी सकट हिने उत्स्फूर्तपणे बाप या विषयावरील कविता सादर केली.

कवी संमेलनात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह प्राध्यापक वर्ग व पालकही सहभागी झाले होते. प्राचार्य डॉ. सहदेव आहेर यांनी कवींचे स्वागत केले. डॉ. प्रवीण जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रा. आनंद पाटेकर यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा. गोरक्ष घोलप यांनी आभार मानले. यावेळी उपप्राचार्य डॉ. मनोहर एरंडे, प्रा. अशोक कवडे, प्रा. सचिन निघुट, डॉ. मनिषा गाडीलकर, डॉ. दुर्गा रायकर, प्रा. संगीता मांडगे, प्रा. स्वाती पवार, प्रा. स्वाती मोरे, प्रा. नीलिमा घुले, प्रा. हर्षदा पंडित, प्रा. पुनम गंधाक्ते, प्रा. नम्रता थोरात, प्रा. अमृता दौंडकर, प्रा. अपेक्षा लामखडे, प्रा. रूपाली गोरडे, प्रा. सुरेश गाडीलकर आदी उपस्थित होते.

### शाळा महाविद्यालयातून संमेलने होणे आवश्यक

आधुनिक तंत्रज्ञानाच्या अतिरेकी वापरामुळे सभोवतीचे वातावरण दूषित झाले आहे. विद्यार्थ्यांमधील संवेदनशीलता कमी होत आहे. त्यांच्यातील जाणिवा जागृत करण्यासाठी शाळा-महाविद्यालयातून कवी संमेलने होणे आवश्यक आहे.

**संजय पठाडे,** गझलकार

# सुप्याचे मा. सरपंच हरिभाऊ पवार निवर्तले

## ९८ व्या वर्षी वृध्दापकाळाने निधन



**सुपा : प्रतिनिधी**

**सुपा गावाचे माजी सरपंच हरिभाऊ नबाजी पवार यांचे ९८ व्या वर्षी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा भास्कर पवार, पोपट पवार, दोन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे.**

२५ वर्षे सुपा गावच्या राजकारणात हरिभाऊ पवार यांनी निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले होते. तब्बल २५ वर्षे त्यांनी सुप्याचे सरपंचपद भुषविले. सुपा गावच्या सामाजिक, शैक्षणिक, देवस्थानांच्या विकासासह गावच्या जडणघडणीत त्यांचे मोलाचे योगदान होते. कै. बाळासाहेब विखे पाटील यांचे विश्वासू सहकारी अशी त्यांची ओळख होती. त्यांच्या कार्यकाळात सुप्यातील दलित वस्तीसाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून मोठया प्रमाणावर जागा उपलब्ध करून देण्यात आली होती.

सुपा येथील अमरधाम येथे त्यांच्यावर शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

# पिंपळनेर येथे नाभिक मेळावा


## खासदार लंके, आमदार दाते यांची उपस्थिती

**सुपा : प्रतिनिधी**

**श्री संत निळोबाराय महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त पिंपळनेर येथे श्री संत सेना महाराज ट्रस्टच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही रविवारी अखंड हरिनाम सप्ताह व नाभिक समाज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. खासदार नीलेश लंके, आमदार काशिनाथ दाते, नाभिक समाजाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यावेळी उपस्थित राहणार असल्याची माहीती तालुकाध्यक्ष भाऊ बिडे यांनी दिली.**

श्री क्षेत्र पिंपळनेर येथे नाभिक संघटनेचे सर्व पदाधिकारी, सदस्य यांच्या अथक परिश्रमातून खासदार, आमदार यांच्या निधी तसेच समाजाच्या योगदानातून श्री संत सेना महाराज यांच्या मंदिराचे काम पुर्ण झाले आहे.

दरवर्षी निळोबाराय महाराजांच्या पुण्यतिथी निमित्त तालुक्यातील नाभिक समाज मोठया संख्येने मेळाव्यासाठी उपस्थित राहतो.




समाजाच्या विविध प्रश्नांवर यावेळी चर्चा, मार्गदर्शन करण्यात येते.

तालुक्याच्या विविध भागांतून पिंपळनेर येथे दिंडया दाखल होतात. शनिवारी प्रवचन, भजन तसेच जागराचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी किर्तन सेवा आणि मेळावा तसेच अन्नदानाचे नियोजन करण्यात आले असून नाभिक बांधवांनी या मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

खासदार नीलेश लंके, आमदार काशिनाथ दाते यांच्यासह समाजाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, नाभिक महामंडळाचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर गायकवाड, उपाध्यक्ष शाम जाधव, भाजपाच्या राज्य कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे, निवृत्त गृहमंत्रालय अधिकारी अवधूत शिंदे, डॉ. श्रीकांत पठारे, ह भ प धनंजय महाराज उदावंत, संतोष घायतडक, सुरेश वाघमारे, गोरक्षनाथ काळे, डॉ. विलास काळे, पिंपळनेरचे सरपंच देवेंद्र लटांबळे, उपसरपंच छाया कळसकर आदी मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत.

# युवा प्रशिक्षणार्थी सुराज रावडे यांचा सन्मान

## रावडे कडूसच्या जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक

**सुपा : प्रतिनिधी**

**कडूस जिल्हा परिषद शाळेत युवा प्रशिक्षणार्थी म्हणून सहा महिन्यांचा कार्यकाळ यशस्वी पुर्ण केल्याबद्दल सुराज रावडे यांचा शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आले.**

राज्य शासनाच्या वतीने युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, त्यांना प्रशिक्षण मिळावे, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत कडूस येथील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये सुराज रावडे यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी त्यांचा सहा महिन्यांचा कार्यकाळ पुर्ण केल्यानंतर सन्मान करत त्यांना निरोप देण्यात आला.



निरोप समारंभाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कडूसचे सरपंच मनोज मुंगसे हे होते. यावेळी बोलताना सरपंच मुंगसे म्हणाले, युवा प्रशिक्षणार्थी म्हणून सुराज रावडे यांनी अत्यंत उत्कृष्ट काम केले असून विद्यार्थ्यांना संगणक साक्षर करण्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.पारनेर तालुक्यातील आदर्श युवा प्रशिक्षणार्थी म्हणून त्यांचे कार्य कौतुकास पात्र असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

यावेळी शिक्षक भाऊसाहेब गवळी, बी.के.दिवटे यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. मुख्याध्यापिका जयश्री काळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर आदर्श शिक्षक सखाराम साठे यांनी केले. पदवीधर शिक्षक गंगाधर भालेराव यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिलीप दिवटे, उपाध्यक्ष सुनील दिवटे, अशोक पंडित, कुणाल रणसिंग यांच्यासह ग्रामस्थ, शाळेचे विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# निवृत्त सैनिक पोपट चौगुले यांचे निधन

## गावच्या अध्यात्मिक कार्यातही योगदान

**दरोडी : प्रतिनिधी**

**दरोडी येथील सैन्य दलातील सेवा निवृत्त सैनिक पोपट भाऊसाहेब चौगुले यांचे अल्प आजाराने निधन झाले.**

स्व. चौगुले हे सन २००२ मध्ये भारतीय सैन्यदलामध्ये भरती झाले होते. सन २०२३ पर्यंत त्यांनी सैन्यदलामध्ये देशसेवा करून ते निवृत्त झाले होते. सैन्य दलात सेवा करताना आपले कुटूंब तसेच दरोडी गावाकडे त्यांचे नेहमी लक्ष असायचे. मंदिराचे काम असो किंवा अखंड हरिनाम सप्ताह असो त्यांनी नेहमीच आपले योगदान दिले होते.



शैक्षणिक, सामाजिक कामात खारीचा वाटा उचलून स्व. पोपट चौगुले यांनी आपली सामाजिक बांधिलकी नेहमीच जपली. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, दोन भाऊ, भावजय, पुतणे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अकाली निधनामुळे दरोडी व परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# स्मार्ट व्हिलेज, आपत्ती व्यवस्थापन आणि सोलर पॅनल!

## किसानच्या विज्ञान प्रदर्शनात भावी वैज्ञानिकांची चुणूक

**पारनेर : प्रतिनिधी**

**स्मार्ट व्हिलेज, आपत्ती व्यवस्थापन, शेततळी, गॅस प्रदुशण रोखणे, मानवी शरीर, हायड्रॉलीक सिटी, ध्वनी प्रदुषण, सुष्मजीव ग्लोबल वॉर्मिंग, त्सुनामी, सोलर पॅनल, अधुनिक शेती, बोअरवेल यांसारखे प्रयोग सादर करत किसान इंटरनॅशनल स्कुलच्या विज्ञान प्रदर्शनामध्ये भावी वैज्ञानिकांची चुणूक दिसून आली.**



पारनेर तालुक्यातील पहिल्या सीबीएसई अभ्यासक्रमाच्या किसान इंटरनॅशनल स्कुलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी सादर केलेली विविध उपकरणे मान्यवरांची दाद मिळवून गेले. किसान परीवाराचे अध्यक्ष, पारनेरचे मा. उपनगराध्यक्ष चंद्रकांत चेडे यांच्या हस्ते तसेच प्राचार्य मनोज राठोर, उद्योजक ऋषीकेश चेडे यांच्या उपस्थितीत या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी बोलताना चंद्रकांत चेडे म्हणाले, विज्ञान प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वैज्ञानिक प्रकल्पांची ओळख होऊन वैज्ञानिक संकल्पनांची समज त्यांच्यात येते. त्यांचा वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित होतो. संशोधनाची आवड निर्माण होऊन व्यवहारिक अनुप्रयोग समजता येतात. सर्जनशील सादरीकरणाची संधी मिळून त्यांच्यातील कौशल्य विकसित होते. नव नवे प्रयोग करण्यासाठी प्रोत्साहन मिळत असल्याचे चेडे यांनी सांगितले.

### किसानच्या गुणवत्तेचे कौतुक

विज्ञान दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेले हे प्रदर्शन पाहण्यासाठी पालक तसेच पारनेरमधील नागरिकांनी गर्दी केली होती. या प्रदर्शनात सुमारे ३५० मॉडेल सादर करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेले प्रयोग व त्यासंबंधी त्यांच्याकडून देण्यात येत असलेली अचूक माहीती पाहून पालक तसेच नागरीकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या शिक्षण संकुलाची शैक्षणिक प्रगती पाहून पालकांनी समाधान व्यक्त केले.

### सामाजिक, नैतिक कौशल्याचा विकास

विज्ञान प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये समस्या-समाधान कौशल्य विकसित होते. शोध आणि विश्लेषणात्मक विचार विकसित होतात. रचनात्मक प्रतिभा विकसित होऊन सामाजिक व नैतिक कौशल्य विकसित होते. प्रदर्शनाच्या माध्यमातून टीम वर्क आणि सहकार्य करण्याची क्षमताही विकसित होते. विद्यार्थ्यांना प्रभावी वैज्ञानिक उपकरणांचे ज्ञान प्राप्त होऊन वैज्ञानिक अभ्यासाचा उपयोग करून अभ्यास समृध्द करण्याची संधी प्राप्त होते.

**चंद्रकांत चेडे,** अध्यक्ष, किसान परिवार

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com